# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)
### -: सभेचे इतिवृत्त :-

मा. प्रशासक तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती, मनपा नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक 11.02.2025 रोजी वेळ दुपारी 02.00 वाजता नविन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात संपन्न झालेल्या वृक्ष प्राधिकरण सभेचे इतिवृत्त.

या सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित आहेत.

1) श्री. गणेश राठोड, उपायुक्त (उद्यान) तथा वृक्ष अधिकारी

2) श्री. अमोल चौरपगार, वृक्ष संवर्धक

या सभेत खालील प्रमाणे नमूद विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

**विषय क्र. 1**

कार्यालयास दिनांक 03.12.2024 ला प्राप्त मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांनी संस्थेच्या परिसरातील केंद्र पुरस्कृत अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या प्रस्तावित नविन लेक्चर हॉल इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडास कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली आहे.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील परिसरात केंद्र पुरस्कृत अंतर्गत नविन लेक्चर हॉल इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून या जागेवर असलेली **पुरातन (हेरिटेज)** करंजी-1, केशिया-1, गुलमोहर-3, पेल्ट्राफार्म-6 व रेनट्री-5 व **नॉन हेरीटेज** कटूम्बर-3, कडूनिम-4, करंजी-2, काटसावर-1, केशिया-8, गुलमोहर-1, चिचबिलाई-2, निलगिरी-1, पेल्ट्राफार्म-11, रेनट्री-3, सिंधी-1, सुबाभूळ-4 अशी एकूण (16+41=57) 57 नग झाडे प्रस्तावित नविन लेक्चर हॉल इमारतीच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र.** 866/PR अन्वये दिनांक 06.01.2025 ला **जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध** करण्यात आलेल्या **जाहिरातीवर 16 नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने** दिनांक 06.02.2025 रोजी

**आक्षेपकर्त्यांची सुनावणी घेण्यात आली असून आक्षेपकर्त्यांनी खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविले आहे.**

1. या प्रस्तावित नविन इमारतीच्या बांधकामा करीता बांधकामाचे Alternate Plan व पर्यायी वृक्ष लागवड संदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली, त्याची माहिती द्यावी.
2. प्रस्तावित नविन लेक्चर हॉलचे बांधकामात स्थलांतरीत करण्यात यावे, जेणेकरून कमी झाडे तोडण्यात येतील तसेच वास्तूविशारद कडून प्रस्तावित इमारतीच्या बांधकाम Design मध्ये बदल करून विभागाला सादर करणे.
3. परिसरात कोणतेही इमारतीचे बांधकामकरणे पूर्वी Environment Clearance घेणे आवश्यक असल्याने ह्याबाबत तपसणी करूनच परवानगी प्रदान करण्यात यावी.
4. तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी वृक्ष लागवड संस्थेने करावी व त्याचे संगोपन करण्यात यावे, याबाबतचा नियोजन आराखडा याची माहिती द्यावी.

या प्रकरणी अर्जदारास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नविन लेक्चर हॉल इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) 16 व नॉन हेरीटेज 41 अश्या एकूण 57 नग झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची 2155 नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नविन लेक्चर हॉल इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरीटेज)** 16 व **नॉन हेरीटेज** 41 अश्या एकूण 57 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण** भाग पाच, जुलै 5, **2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण** 6 **मुख्य अधिनियमाच्या कलम** 8 मधील पोट कलम **(4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी** किमान 6 फुट **इतक्या उंचीची** 2155 **नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 21,55,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 2,15,500/- असे एकूण रु. 23,70,500/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** 16 व **नॉन हेरीटेज** 41 विविध प्रजातीची अशी एकूण 57 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

चर्चे दरम्यान अर्जदाराने दिलेल्या पत्रानुसार सदरहू बांधकामासाठी नगर रचना विभागाची परवानगी संबधित विभागाकडून प्राप्त झाल्यावर सादर करण्यात येईल तसेच बांधकामकरीता Environmental Clearance प्राप्त झाल्यावर सादर करण्यात येईल. संस्थेच्या जागेवरील प्रस्तावित नविन लेक्चर हॉल इमारतीच्या बांधकामात तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात नविन पर्यायी 2155 नग झाडे या संस्थेच्या परिसरातील मोकळ्या जागेत लावण्यात येतील त्याचे 7 वर्ष संगोपन करण्यात येईल. तसेच अर्जदाराच्या दिनांक 12.02.2025 ला दिलेल्या पत्रान्वये, शासकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेच्या महाविद्यालय परिसरात लेक्चर हॉल आणि डेमॉन्ट्रेशन रूम चे बांधकामास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून, या संस्थेच्या परिसरात इतरत्र कुठलीही जागा उपलब्ध नसल्याने सदरहू लेक्चर हॉल इमारतीचे बांधकाम पेइंग वार्ड च्या समोरील तसेच लायब्ररीच्या मागे असलेल्या प्रस्तावित रिक्त जागेवर सोयीस्कर आहे. करीता पर्यायी योजना (Alteranate Plan) नाही यास्वरूपाचे पत्र कार्यालयास प्राप्त आहे. एकंदरीत भारत सरकारच्या परवानगीने प्रत्येक कॉलेज मध्ये पदवी पूर्व विद्यार्थ्यांचा 50 सीट वाढविण्याचे ठरविण्यात आले होते. महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आता 250 करण्यात आली असल्याने लेक्चर हॉल सुद्धा मोठे करणे आवश्यक आहे. या करीता भारत सरकारच्या (केंद्र पुरस्कृत) सहकार्याने या संस्थेच्या परिसरात नविन लेक्चर हॉलच्या बांधकामाकरिता निधी मंजूर करण्यात आला आहे. सबब हि बाब वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सोयी-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असल्याने आक्षेपकर्त्यांनी वरील उपस्थित केलेले आक्षेप अस्वीकार करून, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नविन लेक्चर हॉल इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या वृक्षांपैकी कोणतेही वृक्ष प्रत्यारोपण करण्या योग्य प्रजातीचे नाही त्यामुळे प्रस्तावित बांधकामास नगर रचना विभागाची तत्वत: परवानगी प्राप्त करण्याच्या अधिन राहून **पुरातन (हेरीटेज)** 16 व **नॉन हेरीटेज** 41 अश्या एकूण 57 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 2155 नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 21,55,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 2,15,500/- असे एकूण रु. 23,70,500/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली वर नमूद विविध प्रजातीच्या **पुरातन (हेरीटेज)** 16 व **नॉन हेरीटेज** 41 विविध प्रजातीची अशी

एकूण 57 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची वृक्ष प्राधिकरण समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 2

कार्यालयास दिनांक 16.12.2024 ला प्राप्त मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांनी संस्थेच्या परिसरात तयार करण्यात येणाऱ्या प्रस्तावित नविन पार्किंग प्लाझा क्र. 1, 2 व 3 इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडास कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली आहे.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील परिसरात नविन पार्किंग प्लाझा क्र. 1, 2 व 3 इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून या जागेवर असलेली **पुरातन (हेरिटेज)** करंजी-3, काटसावर-1, पिंपळ-1 (प्रत्यारोपण), बाभूळ-1, रेनट्री-1 व **नॉन हेरीटेज** अमलतास-2, अशोका-1, कटूम्बर-2, कडूनिम-2, करंजी-1, काटसावर-2, केशिया-12, चंदन-1, चिंच-1, पिंपळ-1, (प्रत्यारोपण), बकुळ-1, बदाम-2, बोर-7, रेनट्री-1, वड-1(प्रत्यारोपण), सिसम-1, सुबाभूळ-2, स्पाथोडीया-4 अशी एकूण (7+44=51) 51 नग झाडे प्रस्तावित नविन पार्किंग प्लाझा क्र. 1,2 व 3 या इमारतीच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 866/PR अन्वये दिनांक 06.01.2025 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीवर 17 नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 06.02.2025 रोजी आक्षेपकर्त्यांची सुनावणी घेण्यात आली असून आक्षेपकर्त्यांनी खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविले आहे.**

5. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर या ठिकाणी डेंटल व नर्सिंग कॉलेज निर्माण करण्यात आले आहे. त्या ठिकाणी कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याकरीता सुद्धा पार्किंग व्यवस्था करण्यात आली नाही.
6. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर परिसरात इतकी मोठी इमारत तयार करण्यात येत आहे, त्या ठिकाणी विद्यालयाकडून पार्किंग व्यवस्था का उपलब्ध करून देण्यात येत नाही.
7. या संस्थेच्या परिसरात नविन इमारती तयार करण्यात येत असताना पार्किंग आराखडा तयार करावयास पाहिजे.
8. तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी वृक्ष लागवड संस्थेने करावी व त्याचे संगोपन

करण्यात यावे, याबाबतचा नियोजन आराखडा याची माहिती द्यावी.

या प्रकरणी अर्जदारास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नविन पार्किंग क्र. 1, 2 व 3 या इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) 7 व नॉन हेरीटेज 44 अश्या एकूण 51 नग झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची 1382 नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील परिसरातील प्रस्तावित नविन पार्किंग क्र. 1, 2 व 3 या इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरीटेज)** 7 व **नॉन हेरीटेज** 44 अश्या एकूण 51 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची** 1382 **नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 14,04,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 1,40,400/- असे एकूण रु. 15,44,400/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** पिंपळ-1, **नॉन हेरीटेज** पिंपळ-1, वड-1 एकूण 3 नग झाडास प्रत्यारोपण तसेच **पुरातन (हेरीटेज)** 6 व **नॉन हेरीटेज** 42 विविध प्रजातीची अशी एकूण 48 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत चर्चा साधक बाधक चर्चा करण्यात आली.

चर्चे दरम्यान अर्जदाराने दिलेल्या दिनांक 12.02.2025 च्या पत्रान्वये, शासकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर या संस्थेत याअगोदर 200 विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता होती. आता विद्यार्थ्यांची क्षमता वाढून सद्यास्थितीत 250 क्षमता करण्यात आली आहे तसेच उपचाराकरीता येणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना सुविधा देण्यासाठी सद्यास्थितीत असलेले इमारत व पार्किंग कमी पडत असून या परिसरात पार्किंगची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्याकरीता संस्थेच्या परिसरातील जुने गेटच्या उजव्या बाजूला असलेल्या रिक्त जागेवर पार्किंग प्लाझा क्र.1, शवविच्छेदनकक्षाला लागून व नर्सिंग कॉलेज समोर पार्किंग प्लाझा क्र. 2 अधिष्ठाता कार्यालय समोरील मोकळ्या जागेवर पार्किंग प्लाझा क्र. 3 इमारतीचे बांधकाम व्हर्टिकल बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून सदरहू जागा पार्किंग प्लाझा करीता सोयीस्कर आहे. या जागेव्यतिरिक्त कुठलीही जागा उपलब्ध नाही, याबाबत कार्यालयास कळविले आहे. तसेच या

बांधकामाकरीता नगर रचना विभागाकडून तत्वतः परवानगी प्राप्त आहे. सदर बांधकामाकरीता Environmental Clearance प्रस्तावित आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेत उपचाराकरीता येणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच या संस्थेतील विद्यार्थी यांच्या सुविधेच्या दृष्टीने नविन पार्किंग प्लाझा चे बांधकाम तातडीने करणे अतिशय गरजेचे असल्याने आक्षेप कर्त्यांनी वरील उपस्थित केलेले आक्षेप फेटाळून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील परिसरातील प्रस्तावित नविन पार्किंग क्र. 1, 2 व 3 या इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरीटेज)** 7 व **नॉन हेरीटेज** 44 अश्या एकूण 51 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची** 1382 **नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 14,04,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 1,40,400/- असे एकूण रु. 15,44,400/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन** (हेरीटेज) पिंपळ-1, **नॉन हेरीटेज** पिंपळ-1, वड-1 एकूण 3 नग झाडास प्रत्यारोपण तसेच **पुरातन** (हेरीटेज) 6 व **नॉन हेरीटेज** 42 विविध प्रजातीची अशी एकूण 48 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 3

कार्यालयास दिनांक 11.10.2024 ला प्राप्त कार्यकारी अभियंता-1, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर येथील म्हाडा सिटी एम्प्रेस मिल क्र. 5, सुभाष रोड, नागपूर या जागेवर प्रस्तावित टेक्सटाईल पार्कच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या दोन चिचबिलाई व एक पाम प्रजातीच्या झाडास कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली आहे.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, म्हाडा सिटी एम्प्रेस मिल क्र. 5, सुभाष रोड, नागपूर या जागेवर टेक्सटाईल पार्कच्या नविन इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून या जागेवर असलेली **पुरातन (हेरिटेज)** चिचबिलाई -1, **नॉन हेरीटेज** चिचबिलाई-1, पाम-1 (1+2=3) 3 नग झाडे प्रस्तावित टेक्सटाईल पार्कच्या नविन इमारतीच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 933/PR अन्वये दिनांक 28.01.2025 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीवर 6 नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 06.02.2025 रोजी आक्षेपकर्त्यांची सुनावणी घेण्यात आली असून आक्षेपकर्त्यांनी खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविले आहे.**

4. या कामाचे नकाशे 02.08.2024 ला रोजी मंजूर करण्यात आले आहे अशे निदर्शनास येत आहे. नगर रचना विभागाकडून कोणत्या आधारावर परवानगी देण्यात आली आहे ? याची माहिती देण्यात यावी.
5. ज्या वेळी म्हाडा यांना Environment Clearance ची विभागाकडून परवानगी देण्यात आली त्यावेळी तेथे वेगळा उपयोग असल्याचे दिसत आहे. नंतरच्या काळात त्या जागेवर टेक्सटाईल पार्क निर्माण करण्यात येईल, त्यानुषंगाने चेंज ऑफ युजर करण्यात आले आहे काय? याबाबतची माहिती देण्यात यावी.
6. तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी वृक्ष लागवड करावी व त्याचे संगोपन करण्यात यावे, याबाबतचे नियोजन आराखडा याची माहिती द्यावी.

या प्रकरणी अर्जदारास म्हाडा सिटी एम्प्रेस मिल क्र. 5, सुभाष रोड, नागपूर या जागेवर टेक्सटाईल पार्कच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरिटेज)** चिचबिलाई -1, **नॉन हेरीटेज** चिचबिलाई-1, पाम-1 (1+2=3) 3 नग झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची 155 नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे.

म्हाडा सिटी एम्प्रेस मिल क्र. 5, सुभाष रोड, नागपूर या जागेवर टेक्सटाईल पार्कच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या वृक्षांपैकी कोणतेही वृक्ष प्रत्यारोपण करण्याचे प्रजातीचे नाही त्यामुळे **पुरातन (हेरिटेज)** चिचबिलाई-1, **नॉन हेरीटेज** चिचबिलाई-1, पाम-1 (1+2=3) 3 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची** 155 **नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 1,55,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 15,500/- असे एकूण रु. 1,70,500/-

रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरिटेज)** चिचबिलाई-1, **नॉन हेरीटेज** चिचबिलाई-1, पाम-1 (1+2=3) 3 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली.

अर्जदाराने दिनांक 12.02.2025 ला दिलेल्या पत्रानुसार या ठिकाणच्या प्रस्तावित बांधकामाकरीता नगर रचना विभागाची तसेच अग्निशामक परवानगी (Fire NOC) मंजुरी प्राप्त आहे. सदर बांधकामाकरीता पर्यावरण मंजुरी दिनांक 18.04.2017 ला घेण्यात आलेले होते. परंतु सदर जागेचा वापरात बदल करण्यात आल्यामुळे पर्यावरण मंजुरी (Environmental Clearance) करीता अर्ज क्र. 93/2024 (C2) दिनांक 08.09.2024 रोजी सादर केलेले आहे. तसेच या प्रस्तावित बांधकामाकरीता तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी 155 नग झाडे म्हाडा सिटी येथील परिसरात लावण्यात येत आहे. सदर जागेवरील टेक्सटाईल पार्कच्या नविन इमारतीमुळे परिसरातील लहान व्यापारांना अत्याधुनिक जागा उपलब्ध होणार आहे. या ठिकाणी असलेले **पुरातन (हेरिटेज)** चिचबिलाई-1, **नॉन हेरीटेज** चिचबिलाई-1, पाम-1 (1+2=3) 3 नग झाडे इमारतीच्या बांधकामात व रॅम्प च्या कामात अडथळा निर्माण करीत असून इमारतीचे बांधकाम करणे शक्य नसल्यामुळे, आक्षेपकर्त्यांनी वरील उपस्थित केलेले आक्षेप स्वीकार करणे संयुक्तिक होणार नाही. करीता वरील अटी शर्तीच्या अधीन राहून, म्हाडा सिटी एम्प्रेस मिल क्र. 5, सुभाष रोड, नागपूर या जागेवर टेक्सटाईल पार्कच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरिटेज)** चिचबिलाई-1, **नॉन हेरीटेज** चिचबिलाई-1, पाम-1 (1+2=3) 3 नग झाडास जमिनीपासून कापणी करण्याची वृक्ष प्राधिकरण समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**उपायुक्त (उद्यान)**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रशासक**
**तथा**
**अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**